# ओएनजीसी कर्मचारी संघटना

( मान्यताप्राप्त युनीयन )

मित्रहो,

ऑफशोअरमध्ये काम करणारया कर्मचारयाना कॅटरींगची सेवा समाधानकारक मिळण्यासाठी ओएनजीसी मॅनेजमेंट व कर्म चारी संघटना गेली अनेक महीने Canteen Contract चा मसूदा तयार करण्यासाठी कार्यरत होती. डायरेक्टर ऑफशोअरशी झालेल्या चर्चेनंतर श्री सेनगुप्ताा साहेबानी निर्देश दिले होते कि  कर्मचारी संघटने बरोबर चर्चा करून कॅटरींग कॉन्ट्रॅक्टमध्ये आवश्यक बदल करा. त्यानुसार श्री संजय अगरवाल GM(HR) याच्याशी जवळ जवळ १५ दिवस चर्चाकरून ऑफशोरमध्ये काम करणारया सहका-याना फायदा होईल असे बदल करण्यात आले व त्याचबरोबर नवीन गोष्टींचा अंतर्भाव करण्यात आला .सदर Contract चा मसूदा तयार होत असताना ड्रायफ्रुटच्या वजनात तसेच साबणाच्या संख्येत वाढ करण्यासाठी कर्मचारी संघटनेने केलेली विनंती मॅनजमेंटने मान्य करून ड्रायफ्रुट ७५ ग्रमचे १०० ग्रम करण्यात आले .या करारनाम्यात मसाले  डाळी कडधान्य तेल तांदूळ व इतर खादयपदार्थ हे नामाकींत कंपन्याचे असण्याबाबतच्या कर्मचारी संघटनेच्या सुचना मॅनेजमेंटने मान्य करून त्यांच्या टेंडर मध्ये समावेश करण्यात आल्या आहेत. कॅटरर्सना ओएनजीसी कडुन पेमेंट होण्यापूर्वी ज्या डेली परफॉमर्स सर्टीफिकेटसची जरूरी असते त्या सर्टीफीकेटवर पुर्वी केवळ OIM ची सही आवश्यक होती आता कॅन्टीन कमीटीत असलेल्या कामगार प्रतिनीधीच्या सहीची आवश्यकता असल्यामुळे कॅन्टीन कॉन्ट्रॅक्टरवर प्लॅटफॉर्म/रिग्सवरील सर्व स्तरातील व्यक्तीकडुन कॅटरर्सच्या मनमानी कारभारावर नियंत्रण ठेवणे शक्य होणार आहे. ऑफशोअरमध्ये कॅटरींग नविन Contract १ मार्च २०१६ पासुन जरी चालू झाले असले तरी ओएनजीसीच्या FMG तसेच MM व इतर सबंधीत सेक्शनच्या कार्यालयीन कार्य वाहीची पुर्तता आज दिनांक १०.०९.२०१६ रोजी झालेली असुन हि पुर्तता झाल्यानंतर सर्वात प्रथम  मॅनेजमेंट कडुन कर्मचारी संघटनेला सदर Contract करारनाम्याची प्रत प्राप्त झालेली आहे. या करारनाम्याची एकुन ८४ पाने असल्यामुळे हा संपुर्ण करारनामा KSच्या साइटवर टाकणे शक्य नाही .केचळ "Scope of work " ची महत्वाची पाने साइटवर टाकत असुन सदर करारनाम्यच्या पुर्ण पानाच्या प्रत्येक दोन प्रती सर्व रिग्स व प्लॅटफार्मवर युनीयन तर्फे पाठविण्यात आल्या आहेत.

धन्यवाद

दिनांक १८.०४.२०१६

आपला नम्र ,

[प्रदीप मयेकर]
सरचिटणीस